<u>सं. फौ. ख. क्र.८७५/२०२१</u> निशाणी २६

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र.२ यांचा शपथेवर जबाब</u>**
**<u>मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,</u>**

नाव – राजाभऊ वासुदेव बचे

वय – ५३ वर्षे, व्यवसाय – सहा पोलीस उपनिरीक्षक, पो.स्टे. उरळ

पत्ता – मोठी उमरी, अकोला, ता. जि. अकोला.

**<u>सरकारतर्फे सरकारी वकिल श्रीमती एस. आर. लोखंडे यांचेमार्फत सरतपास सुरुः</u>**

१. मी सन २०२० ते आजपर्यंत उरळ पो.स्टे. येथे सहा पोलीस उपनिरीक्षक म्हणून कार्यरत आहे. दि.१९.१०.२०२१ रोजी मी पो.स्टे. येथे दिवसपाळी कर्तव्यावर हजर असताना संध्या.६.३० वा. आमच्या गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, ग्राम लोहारा येथे एक इसम त्यांच्या घरामध्ये देशी दारुची अवैधरित्या विना परवाना विक्री करीत आहे. सदर मिळालेली बातमी आमचे ठाणे इन्चार्ज यांना फोनद्वारे सांगितली. सदर बातमीची शहानिशा करण्याकरीता मी, एक महिला कर्मचारी शालिनी महाद्वारे, गजानन ठोंबरे तसेच दोन पंच असे मिळून आम्ही खाजगी वाहनाने ग्राम लोहारा येथे गेलो. दोन पंचांना पंचनामा करण्याकरीता पाचारण करुन त्यांना सविस्तर माहिती सांगितली.

२. ग्राम लोहारा येथील राजू मालटे याच्या घराच्या जवळ आम्ही गेलो तेथे आम्ही छापा टाकला असता त्याच्या ताब्यातून देशी दारुच्या टॅंगो कंपनीच्या ९० मिली क्षमतेच्या ३० बाटल्या असा एकुण रु.८५०/– किंमतीचा मुद्देमाल मिळून आला. सदर इसमास त्याचे नाव विचारले असता त्याने राजू मालटे असे सांगितले तसेच त्याच्या जवळ दारु विक्रीचा परवाना नसल्याचे त्यांने सांगितले. सदर मिळून आलेल्या मुद्देमालातून एक बॉटल सि.ए. परिक्षणाकरीता काढून त्यावर दोन पंचांच्या व माझ्या सहीचे कागदी लेबल चिकटविले तसेच उर्वरीत मुद्देमाल हा दोन पंचांसमक्ष जप्त केला तसेच घटनास्थळ पंचनामा केला. आता मला सदर घटनास्थळ पंचनामा व जप्ती पंचनामा दाखविण्यात आला त्यावर माझी, दोन पंचांच्या सह्या असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास अनुक्रमे **नि.क्र.२७ व २८** देण्यात येत आहे.

३. सदर आरोपीस समजपत्र दिले. आता मला सदर समजपत्र दाखविण्यात आले त्यावर आरोपीची सही असून त्यातील मजकूर मी नमुद केलेला असून तो खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२९** देण्यात येत आहे. सदर उर्वरीत मुद्देमाल घेवून आम्ही पो.स्टे. ला आलो व सदर घटनेबाबतची लेखी फिर्याद मी पो.स्टे. येथे आरोपी राजू मालटे याच्या विरुध्द दाखल केली. त्यावरुन आरोपीविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला. आता मला सदर फिर्याद दाखविण्यात आली त्यावर माझी सही असून त्यातील संपुर्ण मजकूर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.३०** देण्यात येत आहे. आता मला छापील फिर्याद दाखविण्यात आली त्यावर माझी सही असून त्यातील संपुर्ण मजकूर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.३१** देण्यात येत आहे.

४. सदर गुन्ह्याचा तपास वरीष्ठांच्या आदेशाने माझ्याकडे देण्यात आला. सदर जप्त केलेल्या मुद्देमालाची एक बाटली ही रासायनिक विश्लेषनाकरीता न्याय वैज्ञानिक प्रयोगशाळा येथे माझ्या पत्रान्वये दिली. आता मला सदरचे पत्र दाखविण्यात आले त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.३२** देण्यात येत आहे. त्यानंतर आरोपीविरुध्द दोषारोप पत्र दाखल केले.

सरतपास पूर्ण.

**<u>आरोपीतर्फे विधीज्ञ श्रीमती व्ही. एच. शेगोकार यांचे मार्फत उलटतपासः</u>**

४. हे म्हणणे खरे आहे की, मी घटनास्थळ पंचनामा व जप्ती पंचनामा हा पो.स्टे. येथे बसून तयार केले व त्यावर दोन पंचांच्या पो.स्टे. येथे सह्या घेतल्या. हे म्हणणे खरे नाही की, मी सन २०२० मध्ये उरळ पो.स्टे. येथे कार्यरत नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, मला कोणतीही गुप्त माहिती मिळाली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या सरतपासादरम्यान आरोपीविरुध्द कथन केलेल्या सर्व बाबी खोट्या सांगितलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामा कोणत्या तारखेला झाला त्याची तारीख मला माहित नाही. घटनास्थळ कोणाच्या मालकीचे आहे, याबाबत कागदपत्र मी अभिलेखवर दाखल केले नाहीत. घटनास्थळाच्या चुतःसिमा तसेच पंचनामा किती वाजता सुरु झाला व किती वाजता संपला, हे मी बघुन सांगू शकतो. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगतो अशी कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीविरुध्द चुकीचे दोषारोप पत्र दाखल केले आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.
**दिनांकः– ०७.०१.२०२६**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

DAYANAND MARUTI WAGHMARE
Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2026.01.07 13:25:01 +0530

**(डी. एम. वाघमारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

प्रमाणपत्र

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :– | **श्री. डी. एम. वाघमारे,** सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :– | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :– | ०७/०१/२०२६ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :– | ०७/०१/२०२६ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :– | ०७/०१/२०२६ |